नोंदणी क्रं. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

दैनिक
यश सिद्धि न्यूज
संपादक : कमलाकर सोनकांबळे
YASH SIDDHI NEWS

वर्ष - ३ रे Year - 3rd | अंक - १९८ Issue - 198 | वार सोमवार दि. ८ डिसेंबर २०२५ Blow- Monday Date 8 December 2025 | ई-पेपर - https://epaper. yashsiddhinews.com वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com | पाने - ४ Pages - 4 | किंमत - ४.०० रुपये Amout - 4 /- Rs | पोस्टल परवाना : SLP/298/2024-2026 ई-मेल आयडी yashsiddhinews@ gmail.com

पूरग्रस्त शेतकऱ्यांना राज्य सरकारकडून ६६३ कोटी मंजूर

मिलिंद साठे राज्याचे नवे महाधिवक्ता; मंत्रिमंडळ बैठकीत महाराष्ट्रासाठी २ मोठे निर्णय

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

नागपूर : विधीमंडळाच्या हिवाळी अधिवेशनाला सोमवारपासून (८ डिसेंबर) सुरुवात होणार आहे. हिवाळी अधिवेशाच्या पूर्वसंध्येला सरकारचा आज चहापानाचा कार्यक्रम पार पडला. या चहापानाच्या कार्यक्रमावर विरोधकांनी बहिष्कार टाकला. विरोधकांनी पत्रकार परिषद घेत अधिवेशनात पूरग्रस्त शेतकऱ्यांना मदत, शेतकरी कर्जमाफीसह विरोधी पक्षनेता पद निवडीबाबतच्या मुद्द्यावरुन सरकारला घेरणार असल्याचा इशारा दिला. त्यानंतर राज्य सरकारचा चहापानाचा कार्यक्रम पार पडला. या कार्यक्रमानंतर राज्य मंत्रिमंडळाची बैठक पार पडली. या बैठकीत महाराष्ट्रासाठी दोन महत्त्वाचे निर्णय घेण्यात आले आहेत. यापैकी एक महत्त्वाचा निर्णय म्हणजे राज्याच्या नवे महाधिवक्तांची निवड करण्यात आली आहे. तर दुसरा निर्णय हा शेतकऱ्यांसाठी घेण्यात आला आहे.

राज्याचे महाधिवक्ता म्हणून मिलिंद साठे यांची निवड करण्यात आली आहे. वीरेंद्र सराफ यांनी काही महिन्यांपूर्वी महाधिवक्ता पदाचा राजीनामा दिल्याची माहिती समोर आली होती. पण महाधिवक्तापदी नव्या विधीतज्ज्ञांची निवड होत नाही तोपर्यंत काही महिने त्यांना जबाबदारी सांभाळण्याची विनंती सरकारकडून करण्यात आली होती. त्यानुसार वीरेंद्र सराफ हे महाधिवक्ता पदाची जबाबदारी पार पाडत होते.

दरम्यान, हिवाळी अधिवेशनाच्या पूर्वसंध्येला नागपुरात आज पार पडलेल्या मंत्रिमंडळ बैठकीत याबाबत निर्णय घेण्यात आला. राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत मिलिंद साठे यांच्या नावावर शिक्कामोर्तब करण्यात आलं. मिलिंद साठे यांचा विधी विभागात दांडगा अनुभव आहे. त्यामुळे राज्याला त्यांच्या अनुभवाचा चांगला फायदा होईल अशी भावना व्यक्त होत आहे.

मुंबई उच्च न्यायालयातील प्रख्यात वरिष्ठ वकील म्हणून आळख असलेले डॉ. मिलिंद साठे हे कायद्यावरील सखोल अभ्यास, कायदेशीर प्रक्रियेवरील प्रभुत्व यासाठी ओळखले जातात. याखेरीज त्यांनी मुंबई हायकोर्ट असोसिएशनचे अध्यक्ष म्हणूनही काम केले आहे. त्यांना विज्ञान, कला, वित्त व व्यवस्थापन या विविध क्षेत्रांतील जाण असल्याने त्यांची विविध विषयांची कायदेशीर मांडणी अधिक व्यापक असल्याचे सांगितले जाते. जानेवारी २०२४ मध्ये कसबा पेठ मतदारसंघातील निधी गैरवापराच्या प्रकरणात मुंबई उच्च न्यायालयाने त्यांची न्यायालय मित्र म्हणून नियुक्ती केली होती. तसेच, विविध महत्त्वाच्या प्रकरणांत त्यांच्या तर्कशुद्ध व अभ्यासपूर्ण मांडणीची दखल न्यायमूर्तींसहित कायदेक्षेत्रात घेतली गेली आहे.

राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत आणखी एक मोठा निर्णय घेण्यात आल्याची माहिती समोर आली आहे. हा निर्णय राज्यातील शेतकऱ्यांसाठी घेण्यात आल्याची माहिती आहे. राज्यात अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांचं प्रचंड नुकसान झालं होतं. या शेतकऱ्यांना आता सरकारकडून मोठी मदत केली जाणार असल्याची माहिती आहे. पूरग्रस्त शेतकऱ्यांसाठी जी उर्वरित रक्कम देणं बाकी आहे ती देण्याबाबतच्या प्रस्तावाला सरकारकडून मंजुरी देण्यात आली आहे. यामुळे १० लाख ६७ शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळणार आहे.

राज्य सरकारने एकूण ६६३ कोटींच्या प्रस्तावाला मंजुरी दिली आहे. मदत आणि पुनर्वसन मंत्री मकरंद पाटील यांनी या प्रस्तावाच्या मंजुरीवर स्वाक्षरी केल्याची माहिती आहे. दरम्यान, राज्य सरकारने २० हजार १२८ कोटी १२ लाख रुपयांची मदत जाहीर केल होती. यापैकी जवळपास १९ हजार ४६३ कोटी रुपये देण्यात आले होते. काही रक्कम देणं बाकी होतं. त्यातील ६६३ कोटी रुपये देण्याच्या प्रस्तावाला मंजुरी मिळाली आहे. या निर्णयानंतर शेतकऱ्यांच्या बँक खात्यात लवकरच मदत मिळणार आहे.

नाशिक सप्तश्रृंगी गड घाटात अपघात; सहा जणांचा मृत्यू

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

नाशिक : नाशिकच्या सप्तश्रृंगी गडाच्या दिशेला जाणाऱ्या घाटावर आज संध्याकाळच्या सुमारास भीषण अपघात झाला. सप्तश्रृंगी गडावरुन दर्शन घेऊन परतत असताना एक इनोव्वा कार ६०० फूट खोल दरीत कोसळली. या भीषण अपघातात गाडीतील सर्व सहा भाविकांचा मृत्यू झाला आहे. अपघातग्रस्त गाडीचा चक १५ इछ ०५५५ असा नंबर आहे. या गाडीतील सर्व भाविक हे पिंपळगाव बसवंतचे रहिवासी असल्याची माहिती समोर आली आहे. कळवण महसूल विभागाकडून घटनेतील मृतकांबाबत प्राथमिक माहिती देण्यात आली आहे.

सप्तशृंगी गडावर दर्शनासाठी गेलेल्या भाविकांची गाडी क्रमांक चक १५ इछ ०५५५ घाटात भवरी धबधब्याजवळ ओव्हरटेकच्या नादात कठडे तोडून ६०० फूट खोल दरीत कोसळली. या अपघातात पटेल परिवारातील सहा जणांचा मृत्यू झाल्याचं समोर आलं आहे. अपघातातील सर्वजण हे पिंपळगाव बसवंत येथील रहिवासी होते. या घटनेत किर्ती पटेल (वय ५०), रशिला पटेल (वय ५०), विठ्ठल पटेल (वय ६५), लता पटेल (वय ६०), पचन पटेल (वय ६०), मनी बेन पटेल (वय ७०) यांचा मृत्यू झाला आहे.

दरम्यान, घटनेची माहिती मिळताच सप्तशृंगी गड आणि वनी पोलीस ठाणे येथील पोलीस अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी तात्काळ घटनास्थळी पोहोचून मदत कार्य करण्यास सुरुवात केली. पण अपघातातील गाडी ही खोल दरीत कोसळल्याने आणि दिवस मावळत असल्याने बचाव कार्यात अडथळा निर्माण होत आहे. त्यामुळे नाशिकवरून रेस्क्यू टीमला पाचरण करण्यात आलेले आहे. या अपघाताच्या घटनेवर संपूर्ण नाशिकमध्ये हळहळ व्यक्त केली जात आहे. एकाच कुटुंबातील सहा जणांचा दुर्दैवी मृत्यू झाल्याने दुःख व्यक्त केलं जात आहे. सप्तश्रृंगी गडावर दर्शनासाठी दररोज शेकडो भाविक येतात. पण शनिवार आणि रविवारच्या दिवशी सुट्टी असल्याने या दिवशी भाविकांची जास्त गर्दी असते. त्यामुळे घाटातही वाहनांची वर्दळ असते. घाट परिसरात गाडी हळू चालवण्याचं आवाहन नियमित केलं जातं. कारण थोडीही चूक झाली तर जीवाला धोका निर्माण होऊ शकतो. आज झालेल्या घटनेमुळे परिसरात मोठी खळबळ उडाली आहे. या अपघातात मोठी जीवितहानी झाली आहे.

यंदाच्या अधिवेशनात आम्ही १८ विधेयके मांडणार : मुख्यमंत्री

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

नागपूर : विरोधी पक्षनेतेपदाचा निर्णय हा विधानसभेचे अध्यक्ष आणि विधान परिषदेचे सभापती घेतील, तो आमचा निर्णय नाही असं राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले. अध्यक्ष आणि सभापती जो निर्णय घेतील तो आम्हाला मान्य असेल असंही ते म्हणाले. सोमवारपासून हिवाळी अधिवेशनाला सुरुवात होणार असले तरी विधानसभा आणि विधान परिषदेला विरोधी पक्षनेता नाही. त्यावर विरोधकांनी सरकारवर टीकाही केली आहे. त्या टीकेला उत्तर देताना देवेंद्र फडणवीस बोलत होते.

राज्याच्या हिवाळी अधिवेशनाच्या पार्श्वभूमीवर सरकारने टाकलेल्या चहापानावर विरोधकांनी बहिष्कार टाकला. त्यावरून देवेंद्र फडणवीसांनी विरोधकांचा समाचार घेतला. यंदाच्या अधिवेशनात आम्ही १८ विधेयकं मांडणार असून ती सर्व मंजूर करण्याचा प्रयत्न करू असंही फडणवीस म्हणाले.

मंत्रीमंडळ बैठक पार पडली आहे. चहापानाचा कार्यक्रम होता. विरोधी पक्षाने परंपरा पाळत बहिष्कार टाकला. त्यामुळे आम्हाला आमचा चहा प्यावा लागला. विरोधी पक्षाची पत्रकार परिषद त्रागा करणारी होती. अनेक गमती झाल्या, भास्कर जाधवांनी विजय वडेट्टीवार यांच्या माईकची बॅटरी बंद केली. विरोधी पक्षाचे पत्र उशिरा आले, त्यावर शरद पवार गटाच्या कोणाचीच सही नाही. याचा मी वेगळा अर्थ काढणार नाही.

कोणावरच आता विरोधकांना विश्वास उरला नाही आहे. संवैधानिक संस्थांवर आगपाखड करत आहेत. राज्य दिवाळखोर दाखवण्याची घाई विरोधकांना झाली आहे. ओढाताणीची परिस्थिती असली तरी राज्य कुठेही दिवाळखोरीकडे चालले नाही. याचा अर्थ हा मूळीच नाही आमच्याकडे खूप पैसे आहेत.

मुख्यमंत्र्यांनी विरोधकांवर निशाणा साधत नियमांवर ठेवला बोट ठेवला

योजना पूर्ण करायला पैसे आहेत आणि आम्ही ते देत आहोत. केवायसीचा प्रश्न आम्ही सोडवत आहोत. शेतकऱ्यांना देखील मदत मिळणार आहे. पावसाची मदत आणि १० हजार रुपयांची मदत देखील दिली आहे.

अधिवेशनात आम्ही सर्व गोष्टींवर चर्चा करायला तयार आहोत. आम्ही समर्पक उत्तर देऊ. अधिवेशन लहान आहे हा मुद्दा मांडला. आचारसंहितेमुळे पूर्ण अधिवेशन घेऊ शकत नाही. जास्तीत जास्त कामकाज करायला आम्ही तयार आहोत. पळून जायची मानसिकता आमची नाही.

विरोधी पक्षनेत्यांचा निर्णय अध्यक्ष आणि सभापतींच्या हाती आहे. अध्यक्ष आणि सभापती घेतील तो निर्णय आम्हाला मान्य असेल. आग्रह नाही आणि दुराग्रह देखील नाही. विरोधकांकडे मुद्दे नाहीत आणि ते रेटून नेण्याची मानसिकता देखील नाही. नागपूरचे अधिवेशन रात्री उशिरा चालतं, प्रत्येक दिवशी १० तास कामकाज चालतं.

छोटे मोठे १८ विधेयकं आम्ही मांडणार आहोत आणि ती सगळी मंजूर व्हावीत यासाठी आम्ही प्रयत्न करू. जनतेच्या आशा आकांक्षा पूर्ण करण्यासाठी सरकारचा प्रयत्न असेल.

गोवा नाईटक्लब आग; २५ जणांच्या मृत्यूप्रकरणी मॅनेजरसह चार जणांना अटक

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

पणजी : गोवा येथील अरपोरा नाइटक्लबमध्ये भीषण आग लागून तब्बल २५ जणांचा मृत्यू झाल्याची घटना घडली. नाईट पार्टीदरम्यान सुरू असलेली मौजमजा काही क्षणांतच आगीच्या तांडवात बदलली. या प्रकरणी क्लबच्या मालकावर गुन्हा दाखल करण्यात आला असून तो फरार आहे. तर चीफ मॅनेजर आणि आणखी ३ कर्मचाऱ्यांना अटक करण्यात आली आहे. एफआयआरमध्ये क्लबचे मालक सौरभ लूथरा आणि गौरव लूथरा, तसेच कार्यक्रम आयोजक आणि मॅनेजर यांची नावे आहेत.

गोव्याचे मुख्यमंत्री प्रमोद सावंत यांनी या दुर्घटनेची न्यायालयीन चौकशी करण्याचे आदेश दिले आहेत. दोषींवर कठोर कारवाई करण्याचे निर्देशही त्यांनी दिले. पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी घटनेबद्दल दुःख व्यक्त केले आहे. मुख्यमंत्री प्रमोद सावंत यांनी उच्चस्तरीय बैठक घेत नुकसानग्रस्त कुटुंबांसाठी मदत जाहीर केली.

विजय वडेट्टीवारांनी महायुती सरकारवर जोरदार टीका | **संविधानिक पद रिक्त ठेवल्यावरूनही टीका**

आजपासून हिवाळी अधिवेशन; विरोधकांचा चहापानावर बहिष्कार

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

मुंबई : उद्यापासून सुरू होत असलेल्या नागपूर हिवाळी अधिवेशनाच्या पार्श्वभूमीवर सरकारने प्रथेनुसार विरोधकांना चहापानाचे आमंत्रण दिले होते. मात्र, या आमंत्रणाला विरोधकांनी बहिष्कार घालत सरकारविरोधात नाराजी व्यक्त केली. याबाबत नागपूरमध्ये विरोधकांनी संयुक्त पत्रकार परिषद घेत महायुती सरकारवर जोरदार टीका केली. काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार यांनी महायुती सरकारच्या अपयशाची कुंडलीच सादर केली आहे.

विजय वडेट्टीवार म्हणाले की, सत्ताधारी पक्षाकडून वैयक्तिक चहापानाचं निमंत्रण काल आम्हाला मिळाले. गेल्या अनेक वर्षांची परंपरा आणि प्रथेने विरोधी पक्षाला निमंत्रण दिले जाते. दुर्दैवाने सत्ताधाऱ्यांची मनसुबा आहे की, दोन्ही सभागृहांचे विरोधी पक्ष नेते नाहीत. दोन्ही सभागृहांचे विरोधी पक्ष नेते पद रिक्त आहे. हे दोन्ही पद संविधानिक पद आहे. दोन्ही संविधानिक पदे रिक्त ठेवून संविधानावर अविश्वास दाखवणाऱ्या सत्ताधाऱ्यांच्या चहापानाला जाण्याचे आम्ही टाळले आहे. त्यामुळे आम्ही चहापानावर बहिष्कार टाकत आहोत, अशी माहिती त्यांनी दिली.

विजय वडेट्टीवार पुढे म्हणाले की, महाराष्ट्रात दररोज सहा ते सात शेतकरी आत्महत्या करत आहेत. शेतकऱ्यांना कर्जमाफी देऊ असे सांगून मतं घेतली आणि आता तारीख पे तारीख देत आहेत. जूनचा मुहूर्त काढल्याचे सांगितले जात आहे. पण, शेतकऱ्यांच्या कर्जमुक्तीचा पत्ता नाही. १९८० भारतीय जनता पक्षाचे १४ आमदार होते. तरीही विरोधी पक्षनेते पद दिले गेले. १९८५ साली भारतीय जनता पक्षाचे १६ आमदार होते, तरीदेखील विरोधी पक्ष नेते दिले गेले होते. काँग्रेसने कधीही सत्ताधारी म्हणून संविधानिक पद रिक्त ठेवले नाही. मात्र, या लोकांना विरोधकांची भीती वाटते की काय किंवा सरकारला मनमानी कारभार करायचा आहे. वाटेल त्या पद्धतीने राज्याचा गाडा हाकायचा आणि काम करायचं. त्यामुळे दोन्ही पद रिक्त ठेवून चहा पानाला बोलवत असतील तर त्यावर बहिष्कार टाकलेला बरा. त्यामुळे आम्ही हा निर्णय घेतला आहे, असा हल्लाबोल देखील त्यांनी यावेळी केला.

कापसावरचा आयात कर ११ टक्क्यांवरून ० टक्के केल्याने कापूस उत्पादक शेतकरी प्रचंड संकटात आहे. देशभरात २०१४ सालापासून एक लाख १२ हजार शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या आहेत. त्यातील ३८.५ टक्के शेतकरी हे महाराष्ट्रातील आहेत. हे सत्ताधाऱ्यांना भूषणावह आहे का? असा विजय वडेट्टीवार यांनी उपस्थित केला. महाराष्ट्रात २०२५ साली पहिल्या आठ महिन्यात ११८३ शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या.

२०२४ साली २७०६ शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या. हे नतभ्रष्ट सरकार आहे. तिघेही जण भांडत आहेत. पण, शेतकऱ्यांकडे यांचे लक्ष नाही. हे म्हणतात की, आम्ही २७ नोव्हेंबरला अतिवृष्टी संदर्भातील मदतीचा प्रस्ताव पाठवला. केंद्रीय कृषिमंत्री म्हणतात की, आमच्याकडे प्रस्तावच आला नाही. तो कदाचित गृहमंत्र्यांकडे अडकून पडला होता, अशी देखील काही चर्चा होत आहे. राज्यात शेतकऱ्यांना अद्याप कुठलीही मदत मिळालेली नाही. शेतकरी विरोधी सरकारच्या चहापानाला जाण्याचे औचित्य आम्हाला वाटत नाही, असे देखील विजय वडेट्टीवार म्हणाले.

अजित पवार म्हणतात की, हे शेतकरी फुकटे आहेत. भारतीय जनता पक्षातील आणि सत्तेतील नेत्यांनी पदोपदी शेतकऱ्यांच्या भरोशावर मोठे होऊन शेतकऱ्यांचा अवमान करण्याचे ठरवले असेल तर अशा सरकारच्या चहापानाला जाण्याचे आम्ही टाळले आहे.

राज्याची तिजोरी खाली झालेली आहे. नऊ लाख ३२ हजार कोटी रुपयांचे कर्ज राज्यावर आलेले आहे. यात विशेष करून राज्याच्या उत्पन्नाचा मोठा हिस्सा जवळपास २२ टक्के कर्ज आणि व्याज फेडण्यात जात आहे. निधी वाटपात सुद्धा प्रचंड भेदभाव होत आहे.संपूर्ण राज्य दिवाळखोरीकडे निघाले आहे, असेही वडेट्टीवार म्हणाले.

विजय वडेट्टीवार पुढे म्हणाले की, लाडकी बहीण, लाडकी बहीण म्हणून पाठ थोपटणाऱ्या सरकारचं लाडक्या बहिणीच्या रक्षणाकडे पूर्णतः दुर्लक्ष झालेले आहे. राज्यात १८ वर्षाखालील चिमुकल्या असुरक्षित आहेत. २०२१ ते २०२५ साली राज्यात लहान मुलींवरील अत्याचारांचे ३७,००० गुन्हे दाखल झालेले आहेत. दररोज २४ अल्पवयीन मुलींची छेड आणि अत्याचाराचे गुन्हे नोंदवले जात आहेत. लाडक्या बहिणींचं रक्षण करण्यात सरकार अपयशी ठरलेले आहे.

संतोष देशमुख हत्या प्रकरणाचा आरोपी कृष्णा आंधळे हा अजूनही सापडत नाही. तो अजून देखील फरार आहे. कोर्टात ते प्रकरण धिम्या गतीने सुरू आहे. सोमनाथ सूर्यवंशी प्रकरणात कोर्टाने पोलीस जबाबदार असल्याचे म्हटले आहे. मात्र, पोलिसांवर कुठलीही कारवाई होत नाही. सरकार पोलिसांना पाठीशी का घालत आहे? असा सवाल देखील विजय वडेट्टीवार यांनी उपस्थित केलाय.

संपादकीय....

शेतकरी हित निर्णय

हिवाळी अधिवेशाच्या पूर्वसंध्येला सरकारचा आज चहापानाचा कार्यक्रम पार पडला. या चहापानाच्या कार्यक्रमावर विरोधकांनी बहिष्कार टाकला. विरोधकांनी पत्रकार परिषद घेत अधिवेशनात पूरग्रस्त शेतकऱ्यांना मदत, शेतकरी कर्जमाफीसह विरोधी पक्षनेता पद निवडीबाबतच्या मुद्द्यावरुन सरकारला घेरणार असल्याचा इशारा दिला. त्यानंतर राज्य सरकारचा चहापानाचा कार्यक्रम पार पडला. या कार्यक्रमानंतर राज्य मंत्रिमंडळाची बैठक पार पडली. या बैठकीत महाराष्ट्रासाठी दोन महत्त्वाचे निर्णय घेण्यात आले आहेत. यापैकी एक महत्त्वाचा निर्णय म्हणजे राज्याच्या नवे महाधिवक्तांची निवड करण्यात आली आहे. तर दुसरा निर्णय हा शेतकऱ्यांसाठी घेण्यात आला आहे. दरम्यान, हिवाळी अधिवेशनाच्या पूर्वसंध्येला नागपुरात आज पार पडलेल्या मंत्रिमंडळ बैठकीत याबाबत निर्णय घेण्यात आला. राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत मिलिंद साठे यांच्या नावावर शिक्कामोर्तब करण्यात आलं. मिलिंद साठे यांचा विधी विभागात दांडगा अनुभव आहे. त्यामुळे राज्याला त्यांच्या अनुभवाचा चांगला फायदा होईल अशी भावना व्यक्त होत आहे. राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत आणखी एक मोठा निर्णय घेण्यात आल्याची माहिती समोर आली आहे. हा निर्णय राज्यातील शेतकऱ्यांसाठी घेण्यात आल्याची माहिती आहे. राज्यात अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांचं प्रचंड नुकसान झालं होतं. या शेतकऱ्यांना आता सरकारकडून मोठी मदत केली जाणार असल्याची माहिती आहे. पूरग्रस्त शेतकऱ्यांसाठी जी उर्वरित रक्कम देणं बाकी आहे ती देण्याबाबतच्या प्रस्तावाला सरकारकडून मंजुरी देण्यात आली आहे. यामुळे १० लाख ६७ शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळणार आहे. राज्य सरकारने एकूण ६६३ कोटींच्या प्रस्तावाला मंजुरी दिली आहे. मदत आणि पुनर्वसन मंत्री मकरंद पाटील यांनी या प्रस्तावाच्या मंजुरीवर स्वाक्षरी केल्याची माहिती आहे. दरम्यान, राज्य सरकारने २० हजार १२८ कोटी १२ लाख रुपयांची मदत जाहीर केल होती. यापैकी जवळपास १९ हजार ४६३ कोटी रुपये देण्यात आले होते. काही रक्कम देणं बाकी होतं. त्यातील ६६३ कोटी रुपये देण्याच्या प्रस्तावाला मंजुरी मिळाली आहे. या निर्णयानंतर शेतकऱ्यांच्या बँक खात्यात लवकरच मदत मिळणार आहे.

निमित्त स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीचे: प्रदर्शन असंस्कृत राजकीय प्रवृत्तीचे....

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

साम, दाम, दंड, भेद, क्रूरपणा, कूटनीती वापरून कोणत्याही परिस्थितीत सत्ता सिंहासनावर आरुढ झालेच पाहिजे ही प्रवृत्ती काय काल-परवाची नाही. ती पुराण काळापासून, इतिहास काळापासून ते आजच्या लोकशाहीच्या काळात अव्याहतपणे चालत आहे. सत्ता स्थानावर आरुढ होण्यासाठी भारतीय इतिहास काळामध्ये परक्यांचं, दुसऱ्यांचं सोडा हो पण आपल्या स्वतःच्या जन्मदात्या पित्याला, भावाला मृत्युदंड दिलेले अनेक उदाहरणे आढळतील. इंग्रजांनी आपल्या भारत देशावर जवळजवळ दीडशे वर्षाहुनी अधिक काळ राज्य केले. या काळात त्यांनी धर्माधर्मात वाद पेटवून, तत्कालीन छोट्या छोट्या राज्यांमध्ये वैमनस्य निर्माण करून फोडा,तोडा आणि राज्य करा. या नीतीने या खंडप्राय देशावर अनेक वर्षे राज्य केले. भारत स्वतंत्र झाल्यानंतर हे चित्र बदलेल असे वाटले होते परंतु १९५२ सालच्या पहिल्या लोकसभेच्या सार्वत्रिक निवडणुकीमध्ये भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार डॉक्टर.बाबासाहेब आंबेडकर या लोकोत्तर महापुरुषाला आपल्याच मुंबई प्रांतामध्ये पराभवाचा सामना करावा लागला. हे किती दुर्दैव म्हणावे लागेल..

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीचा एक भाग असलेल्या नगरपरिषदाच्या निवडणुका या संपूर्ण महाराष्ट्रामध्ये नुकत्याच पार पडल्या. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका या कार्यकर्त्यांच्या निवडणुका असतात असं बोललं जातं. पण खरंच या निवडणुकीमध्ये कार्यकर्त्यांना संधी मिळते का?? आमदार, खासदार, मंत्री संत्री यांच्या नातलगांना, पाहुणे मंडळींनाच प्रथम संधी मिळते. ही यावर्षीच्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत उघड झाले आहे. एखाद्या नेत्याच्या नातेसंबंधातील व्यक्तीचे कार्य जर प्रामाणिक असेल तर अशा नातलगांना संधी भेटलीच पाहिजे त्याबद्दल काही दुमत नाही. पण कार्यकर्त्यांच्या निवडणुका म्हणतात आणि सत्तेच्या हव्यासापोटी आपल्याच घरच्या लोकांना आणि पक्षांतर केलेल्यांना उमेदवारी देऊन त्यांना निवडून आणले जात आहे. हे कितपत योग्य आहे?? बळी तो कान पिळी याचा प्रत्यय सर्वत्र येत आहे. निवडणुका येतील जातील पण दुभंगलेली मने पुन्हा जुळणार आहेत कसे?? लाचखोरी आणि फुकट्यांची योजनांचा यांचा उच्चारण न करताना केवळ विकास या शब्दाभोवती निवडणुका होत नाहीत का?? पूर्वीच्या काळी राजेशाही होती. राजाचाच मुलगा हा पुढचा राजा होत होता. पण आता लोकशाहीमध्ये देखील तेच घडतंय अस आपणास वाटत नाही का?? लोकशाहीच्या विकेंद्रीकरणासाठी महाराष्ट्र राज्याचे पहिले मुख्यमंत्री स्वर्गीय यशवंतराव चव्हाण यांनी महाराष्ट्रामध्ये पंचायत राज ही संकल्पना रुजवली. भारतीय स्वतंत्र्यापासूनचा जर इतिहास पाहिला तर काही काही घराणी ही अशी आहेत की ते पिढ्यान पिढ्या सत्तास्थानाला चिटकून आहेत.खरंच सत्तेचे विकेंद्रीकरण झालेले आहे का? हा खरा प्रश्न आहे.काही वर्षांपूर्वी समान विचारधारेच्या आधारावर राजकीय पक्षांमध्ये महाआघाडी किंवा महायुती होत होती.पण सध्याच्या घडीला या समान विचारधारेला फाट्यावर मारून केवळ कोणत्याही परिस्थितीत सत्ता मिळावे हा एकमेव उद्देशाने सारे जण एकत्र येत आहेत.या निवडणुकीतील संपूर्ण परिस्थितीचा जर विचार केला तर ही निवडणूक राज्यातील सत्तेमध्ये जे प्रमुख तीन पक्ष आहेत यांच्यामध्येच अतिशय चुरशीने लढवली गेल्याचे आपणास दिसेल. तीही एकदम विकारी जहरी शब्दांमध्ये टीका टिप्पणी करून लढवली गेली. तीनही पक्षाचे शीर्ष नेते, जबाबदार नेते हे आम्हीच या राज्याचे खरे मालक आणि आपणा जनतेचे कैवारी आहोत असे उरबडवून सांगत होते. काही ठिकाणी तर केवळ परंपरा मोडीत निघू नये म्हणून निवडणुकीचे फॉर्म भरणाऱ्यांना कमालीची पीडा देत होते. काही ठिकाणी सख्खे भाऊ हे एकमेकांवर विकारी शब्दप्रयोग करत होते. आपल्या महाराष्ट्राच्या राजकीय इतिहासात मांडीला मांडी लावून बसणाऱ्यांमध्ये इतकी सत्तेसाठीची खेचाखेची पाहिली नसेल.यापूर्वीही मित्र पक्षांमध्ये एकमेकांच्या विरोधात लढती होत होत्या. पण त्या तेवढ्यापुरत्या. अनेक ठिकाणी मैत्रीपूर्ण लढती होत असत. यापूर्वी एखादा अपवाद वगळता कोणीही कोणावरही पातळी सोडून टीका केलेली ऐकिवात नाही. आज सर्रासपणे एकमेकांवर पातळी सोडून टीका केली जात आहे.या निवडणुकीच्या माध्यमातून जनतेला आळशी आणि काम चोर बनवण्याचं काम सारे राजकीय पक्ष करत आहेत. सत्तेमधील आणि विरोधातील राजकीय मंडळी हे सर्वांना सर्व काही फुकट देण्याचे आश्वासन देत आहेत. अशा या प्रवृत्तीतून कळत नकळत राष्ट्रीय संपत्तीचे नाश करण्याचे उद्योग होत आहे. गेल्या लोकसभेच्या आणि विधानसभेच्या निवडणुकांमध्ये आपल्याच महायुतीचा अथवा आघाडीचाच खासदार, आमदार झाला पाहिजे यासाठी प्राणप्रणाने प्रयत्न करणारे कार्यकर्ते आज एकमेकांच्या उरावर बसत आहेत. एकमेकांची उणीदूनि काढत आहेत. सत्तेच्या मोहापाई लोभापाई माणुसकी आणि नीतिमत्ता माती मोल होत आहे. नुसताच भौतिक विकास म्हणजे विकास न्हवे.आपल्यामध्ये वैचारिक विचार आणि संस्कृतपणा रुजवावा लागेल.नुसत छत्रपती शिवाजी महाराजांचा जयजयकार करून आपणास चालणार नाही. महाराजांचे विचार आपणास कृतीमध्ये दाखवावा लागेल. महाराजांनी झुंडशाही, गुन्हेगार प्रवृत्ती, अन्याय अत्याचाराच्या विरुद्ध असा काही प्रहार केला की अशा नीच प्रवृत्तीने स्वराज्यामध्ये कधीच मुंडकी वर काढले नाहीत. आज सर्वत्र झुंडशाही गुंडशाही प्रवृत्तीला अभय दिले जात आहे. सर्वच पक्ष हे त्यांना स्वतःहून सत्तास्थानावर विराजमान होण्याची संधी देत आहेत. निवडणूक काळामध्ये मतदारांना आपल्याकडे आकर्षित करण्यासाठी सर्रास पैशाचा वापर होत आहे.आणि स्वाभिमान शून्य मतदार देखील दिलेले पैसे, दिलेली लाच स्वीकारत आहेत. नव्हे ती लाच स्वीकारण्यासाठी चढाओढ करत आहेत.काही ठिकाणी तर उमेदवारांकडून मताच्या संख्येनुसार त्यांना मोटार सायकल, गाड्या पुरवण्याचे प्रकार घडतायेत असे म्हणतात. मग तुम्हीच सांगा की एखाद्या प्रामाणिक गोरगरिबाला स्थानिक स्वराज्य संस्थेची निवडणूक लढवायची असेल तर त्याचे ते स्वप्न कधी पूर्ण होईल का???

क्षेत्र कोणतेही असो मग ते राजकारण की आणखीन कुठलेही. प्रामाणिकपणे या देशाची सेवा करणारे अनेक मंडळी आहेत. पण अशा देशप्रेमी लोकांची संख्या रोडावत चालली आहे.. हेच खूप दुःखदायक आहे.

शब्दांकन..
श्री. मारुती देविदास शिंदे..
७०८३५६३६५९

गौरमध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना अभिवादन

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

कळंब प्रतिनिधि/ सुधाकर रणदिवे, कळंब तालुक्यातील गौर येथे दि. ६ डिसेंबर रोजी पंचशील तरुण मित्र मंडळ गौर यांच्या वतीने भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार बोधिसत्व, परमपूज्य, भारतरत्न, महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या ६९ वा महापरिनिर्वाणदिन साजरा करण्यात आला.

त्याप्रसंगी मंडळातील सर्व सदस्य कार्यकर्ते व भीम नगर मधील सर्व बौद्ध उपासक उपासिका मोठया प्रमाणात उपस्थित होते.

पडघ्यात महापरिनिर्वाण दिनाच्या पूर्वसंध्येला डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना अभिवादन

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

ठाणे प्रतिनिधी/मिलिंद जाधव :भिवंडी तालुक्यातील पडघे येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या ६९ व्या महापरिनिर्वाण दिनाच्या पूर्व संध्येला अभिवादन कार्यक्रम पडला. क्रांतीसूर्य महात्मा ज्योतिबा फुले व विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर संयुक्त जयंती महोत्सव, पडघे विभाग यांच्या वतीने आदरांजली वाहण्यात आली.

कार्यक्रमाचे आयोजन जिल्हा परिषद मराठी शाळा, पडघे येथे करण्यात आले. परिसरातील नागरिक, महिला, युवक यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस

पुष्पहार अर्पण केले आणि त्यांना विनम्र अभिवादन केले.

महापरिनिर्वाण दिनानिमित्त डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची सामाजिक चळवळ अधिक गतिमान करण्याचा संकल्पही उपस्थित नागरिकांनी व्यक्त केला.

मोहा येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या ६९ व्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त अभिवादन

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

कळंब प्रतिनीधी/सुधाकर रणदिवे : कळंब तालुक्यातील मोहा येथे भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार, बोधिसत्व परमपूज्य डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त अभिवादन करण्यात आले. याप्रसंगी महामानव भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यास ऑल इंडिया पँथर सेनेचे जिल्हाध्यक्ष अशोक कसबे यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले त्यानंतर त्रिशरण पंचशील घेऊन सर्व समाज बांधवांच्या उपस्थितीत विनम्र अभिवादन करण्यात आले.

यावेळी ऑल इंडिया पॅन्थर सेनेचे जिल्हाअध्यक्ष अशोक कसबे, सामाजिक कार्यकर्ते बाबासाहेब कसबे, आकाश कसबे, कोंडीबा कसबे, गणेश कसबे, अजय कसबे, शुभम कांबळे, साई गायकवाड व समाज बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

संविधान अमृत महोत्सवी वर्षानिमित्त डिजिटल संविधान चित्ररथाचे मुख्यमंत्र्यांच्या हस्ते उद्घाटन

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

मुंबई : राज्य शासनाच्या सांस्कृतिक कार्य विभागामार्फत संविधान अमृत महोत्सवी वर्षानिमित्त डिजिटल संविधान चित्ररथ तयार करण्यात आलेला आहे. या चित्ररथाचे आज ६ डिसेंबर रोजी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते रवींद्र नाट्य मंदिराच्या प्रांगणात, प्रभादेवी मुंबई येथे उद्घाटन करण्यात आले. याप्रसंगी राज्याचे सांस्कृतिक कार्य मंत्री ॲड. आशिष शेलार, कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता मंत्री मंगलप्रभात लोढा, माजी राज्यमंत्री भाई गिरकर, सांस्कृतिक कार्य संचालनालयाचे संचालक बिभीषण चवरे, पु ल देशपांडे महाराष्ट्र कला अकादमीच्या संचालक श्रीमती मीनल जोगळेकर व इतर मान्यवर उपस्थित होते. हा चित्ररथ राज्यात विविध ठिकाणी फिरणार आहे. या चित्ररथामध्ये संविधानाची माहिती, संविधानाच्या मुलतत्त्वावरील माहिती, महत्त्वाची घडामोडी व लोकशाहीच्या मुल्यांवरील कलात्मक सादरीकरण व याबाबतचे प्रदर्शन बघायला मिळेल.

या चित्ररथाद्वारे संविधान बाबतची जनजागृती करण्यात येणार आहे. संविधानाची माहिती सर्वसामान्यांना माहित व्हावी, या उद्देशाने या चित्ररथाची निर्मिती करण्यात आलेली आहे.

राज्यातील जास्तीत जास्त जनतेने या चित्ररथ प्रदर्शनाचा लाभ घ्यावा, असे आवाहन सांस्कृतिक कार्य मंत्री ॲड. आशिष शेलार यांनी केले आहे.

५० मराठी चित्रपटांना १४ कोटी ६२ लाख रुपयांचे अर्थसहाय्य

सांस्कृतिक कार्य मंत्री ॲड. आशिष शेलार; चित्रपट नगरीचा अंतिम आराखडा मंजूर, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज चित्रपटाचे पोस्टर अनावरण

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

मुंबई: सामाजिक आशय, कलात्मक दर्जा आणि प्रयोगशीलतेमुळे वेगळे ठरले आहेत. अशा ५० मराठी चित्रपटांना १४ कोटी ६२ लाख रुपयांचे अर्थसहाय्य आपणास वितरित करत आहोत. सन्मानित करतो आहोत. ही केवळ आर्थिक मदत नसून सामाजिक आशय असलेल्या नावीन्यपूर्ण तंत्राचा वापर करणाऱ्या प्रेक्षकांच्या जाणीव जागृतीला हातभार लावणाऱ्या मराठी चित्रपटांना मदत करण्यासाठी शासन नेहमीच प्रोत्साहन देत आले आहे, असेही सांस्कृतिक कार्य मंत्री ॲड. आशिष शेलार यांनी सांगितले. तसेच चित्रपट नगरीचा अंतिम आराखडा मंजूर झालेला आहे असेही ते म्हणाले.

रविंद्र नाट्यमंदिरात सांस्कृतिक कार्य विभागाच्या महाराष्ट्र चित्रपट, रंगभूमी आणि सांस्कृतिक विकास महामंडळातर्फे आयोजित दर्जेदार चित्रपटांना अर्थसहाय्य योजनेचा धनादेश वितरण सोहळा, गणेशोत्सव रिल्स स्पर्धा पारितोषिक वितरण समारंभ आणि राष्ट्रसंत तुकडोजी महाराज चित्रपटाचे पोस्टर अनावरण केले. या कार्यक्रमप्रसंगी सांस्कृतिक कार्य व माहिती तंत्रज्ञान मंत्री ॲड.आशिष शेलार बोलत होते.

यावेळी सांस्कृतिक कार्य विभागाचे सचिव डॉ. किरण कुलकर्णी, महाराष्ट्र चित्रपट, रंगभूमी आणि सांस्कृतिक विकास महामंडळाच्या व्यवस्थापकीय संचालक स्वाती म्हसे पाटील, सह व्यवस्थापकीय संचालक प्रशांत साजणीकर,चित्रपट सृष्टीतील कलाकार ,दिग्दर्शक, यासह पुरस्कार विजेते उपस्थित होते.

मंत्री ॲड.आशिष शेलार म्हणाले की, चित्रपट हा फक्त मनोरंजन देणारा प्रयोग नाही; तो समाजाच्या मनाशी थेट संवाद साधणारे, विचार जागवत राहणारे शक्तिशाली माध्यम आहे. स्त्री-समानता, जातीय समता, पर्यावरण, ग्रामीण जीवन, नवउद्योग या असंख्य विषयांवर मराठी आणि भारतीय चित्रपटांनी गेल्या दशकांत जनजागृती केली आहे.फिल्म सिटीचा अंतिम आराखडा मंजूर झालेला आहे. फिल्म सिटीच्या धर्तीवर महाराष्ट्रातच अद्यावत ऑडिओ व्हिज्युअल गेमिंग सेंटर मुंबईत उभा करणार आहोत असेही ते म्हणाले.

मंत्री ॲड.आशिष शेलार म्हणाले की, आज ५० चित्रपटांत - राष्ट्रीय पुरस्काराने सन्मानित ४ चित्रपट, राज्य पुरस्काराने गौरवलेले ३ चित्रपट, 'अ' दर्जा प्राप्त १० चित्रपट, 'ब' दर्जा प्राप्त २३ आणि 'क' दर्जा प्राप्त १० चित्रपटांचा समावेश आहे. या सर्व चित्रपटांना मिळून एकूण सुमारे १४ कोटी ६२ लाख रुपयांचे अर्थसहाय्य आज आपण वितरित करीत आहोत. या योजनेकरिता मूल्यांकन प्रक्रिया पारदर्शकपणे पार पाडणाऱ्या परीक्षक समितीचेही मी मनःपूर्वक आभार मानतो.थतएड २०२५ या जागतिक ऑडिओ-व्हिज्युअल समिटमधून महाराष्ट्राने क्रिएटीव्ह इकॉनॉमी हब होण्याचा ठोस निर्धार व्यक्त केला आहे.

मंत्री श्री शेलार म्हणाले की, महाराष्ट्राला संत-महात्मे, क्रांतिकारक, समाजसुधारक, विचारवंत, कलावंत, खेळाडू यांचा समृद्ध वारसा लाभला आहे. अशा महनीय व्यक्तींच्या जीवनकार्याची ओळख पुढील पिढ्यांपर्यंत पोहोचवणे हे आपले कर्तव्य आहे; म्हणूनच शासन विविध क्षेत्रातील थोर व्यक्तिमत्त्वांच्या जीवनावर आधारित चरित्रपट निर्मितीची योजना राबवत आहे. याच योजनेंतर्गत राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या जीवनावर आधारित चित्रपटाची निर्मिती सुरू आहे आणि आज या चित्रपटाच्या पोस्टरचे अनावरण येथे संपन्न होत आहे, ही अत्यंत आनंदाची बाब आहे त्यांच्या कार्याची माहिती नव्या पिढीला होण्यासाठी हा चित्रपट नक्कीच मार्गदर्शक ठरेल, असेही ते म्हणाले.

यावेळी सांस्कृतिक कार्य विभागाचे सचिव डॉ. किरण कुलकर्णी यांनी विभागाच्या योजना व नावीन्यपूर्ण उपक्रम यांची माहिती दिली. महाराष्ट्र चित्रपट, रंगभूमी आणि सांस्कृतिक विकास महामंडळाच्या व्यवस्थापकीय संचालक स्वाती म्हसे पाटील यांनी प्रास्ताविक केले.यावेळी दर्जेदार चित्रपटांना अर्थसहाय्य योजनेचा धनादेश वितरण सोहळा पार पडला. गणेशोत्सव रिल्स स्पर्धेच्या विजेत्यांना पारितोषिक वितरण करण्यात आले.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी मुद्रक, प्रकाशक, संपादक कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार, रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ, सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु. पो. गोगांव ता. अक्कलकोट जि. सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. **संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे** ई-मेल - yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com Mo. 9921988358

This Newspaper is printed by the Owner Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur-413002 (Maharashtra), Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 (Maharashtra). Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

■ **प्रशासकीय कार्यालय :** सम्यक उद्योग समूह, पृथ्वी एंटरप्राइजेस, सर्वे नं. ६५९/८, शॉप नं. ४, राजीव गांधी नगर, न्यू अप्पर बस स्टॉप, बिबवेवाडी पुणे-३७ ■ **विभागीय कार्यालय :** प्रबुद्ध इंटरप्राइजेस, दुकान नं. २ अमरधान चौक, खेमानी उल्हासनगर ४२१००२

शरीर सुदृढ करण्यासाठी मुलांनी मैदानी खेळाकडे आकर्षित व्हावे

मल्लिकार्जुन मसुती यांचे प्रतिपादन; सौ सुरेखा कल्याणशेट्टी उच्च माध्यमिक विद्यालयात क्रीडा सप्ताहाचा शुभारंभ

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

अक्कलकोट/प्रतिनिधी : माहिती आणि तंत्रज्ञानाच्या युगात मोबाईल, व्हाट्सअप, फेसबुक, ट्विटर, गुगल या मुळे विज्ञानाच्या क्षेत्रात प्रगती झाली आहे. परंतु मैदानी खेळाकडे दुर्लक्ष झाले आहे. शरीर सुदृढ व निरोगी असावे असे वाटत असेल तर मुलांनी मैदानी खेळ खेळावेत असे प्रतिपादन म ल्लिकार्जुन मसुती यांनी केले.

महर्षी विवेकानंद सम ाजकल्याण संस्था संचलित सौ सुरेखा कल्याणशेट्टी उच्च माध्यमिक विद्यालयाने आयोजित केलेल्या क्रीडा सप्ताहाचा शुभारंभ करताना ते बोलत होते. यावेळी संस्थेचे जेष्ठ संचालक मल्लिनाथ कल्याणशेट्टी, विभाग प्रमुख पूनम कोकळगी, प्राचार्य डॉ राजेंद्रसिंह लोखंडे, मुख्याध्यापक मलकप्पा भरमशेट्टी उपस्थित होते.

पुढे बोलताना ते म्हणाले की, कबड्डी, खो-खो, व्हॉलीबॉल, क्रिकेट,भालाफेक,थाळीफेक, गोळाफेक या क्रीडा प्रकारासाठी कसरत करावी लागते. त्यामुळे शरीरातील अवयव सदृढ होतात. त्यातून निरोगी जीवनाची प्राप्ती होते. म्हणून मैदानी खेळ महत्त्वाचे आहेत.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्राचार्य मलकप्पा भरमशेट्टी यांनी केले, आभार प्रा सलोनी शहा यांनी मानले, कार्यक्रमास प्रा गुरुशांत हपाळे, कुमार जाधव, चंद्रकांत बिराजदार, प्रा मधुबाला लोणारी, शितल टिंगरे, सविता स्वामी, शितल फुटाणे, शिवकुमार मठदेवरू, शिल्पा धूमशेट्टी उपस्थित होते.

क्रीडा सप्ताहातील मैदानी खेळ

कल्याणशेट्टी उच्च माध्यमिक विद्यालयाने आयोजित केलेल्या क्रीडा सप्ताहामध्ये कबड्डी, खो-खो, भालाफेक, गोळा फेक, थाळीफेक,आदी मैदानी सामने होणार आहेत.

स्वा. सावरकर विद्यालय कोठुरे येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर महापरिनिर्वाण दिन साजरा

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

निफाड/प्रतिनिधी : स्वातंत्र्यवीर सावरकर विद्यालय कोथळी येथे डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांचा महापरिनिर्वाण दिन साजरा करण्यात आला.

याप्रसंगी अध्यक्षस्थानी विद्यालयाचे मुख्याध्यापक सातपुते एस. एल. हे होते व्यासपीठावर ज्येष्ठ शिक्षक शिक्षिका उपस्थित होत्या. उपस्थित मान्यवरांच्या व सर्व शिक्षक शिक्षिका यांच्या हस्ते प्रतिमेचे पूजन करण्यात आले. इयत्ता पाचवी अ चा विद्यार्थी श्लोक मोगल तसेच आठवीची विद्यार्थिनी ओवी मोगल यांनी डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवन कार्याविषयी माहिती सांगितली.

शिक्षकीय मनोगतांमध्ये सानप एस.डी यांनी डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांनी समाजामध्ये समता, बंधुता आणि न्याय या जीवन मूल्यांचा अवलंब करून लोकांमध्ये जाणीव जागृती निर्माण केली अध्यक्षीय मनोगतामध्ये विद्यालयाचे मुख्याध्यापक सातपुते एस. एल .यांनी तत्कालीन समाजामध्ये उच्चशिक्षित असलेले डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांनी विविध क्षेत्रांमध्ये विविध विषयांचा प्रसंगी विदेशात जाऊन ज्ञान संपादित करून एक तत्त्वज्ञानी मनुष्य कशा पद्धतीने समाजाला दिशा देऊ शकतो याचं उत्तम उदाहरण म्हणजे डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर आहेत. विचार व्यक्त केले. यावेळी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन नंदन दिघे व वैभव मोगल यांनी केले कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी सांस्कृतिक समिती व सर्व शिक्षक शिक्षिका शिक्षकेतर कर्मचारी विद्यार्थी यांचे सहकार्य लाभले.

गटविकास सेवा अधिकाऱ्यांचे सामूहिक रजा आंदोलन

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

सोलापूर / प्रतिनिधी : वर्धा जिल्ह्यातील आर्वी पंचायत समितीच्या गटविकास अधिकारी सुनीता मरसकोल्हे यांच्या अटकेच्या निषेधार्थ म हाराष्ट्र विकास सेवा संघटनेतर्फे जिल्ह्यातील पंचायत समिती व जिल्हा परिषद मुख्यालयातील अधिकारी ४ ते ६ डिसेंबरदरम्यान सामूहिक रजा आंदोलन करत आहेत. या आंदोलनात गटविकास अधिकारी, सहाय्यक गटविकास अधिकारी यांच्यासह परिषदेचे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी व उपमुख्य कार्यकारी अधिकारी यांचाही सहभाग असणार आहे.

या संदर्भात जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम यांना बुधवारी निवेदन देण्यात आले. शासनाने सोमवार, ९ डिसेंबरपर्यंत सकारात्मक भूमिका घेतली नाही तर महाराष्ट्र विकास सेवेतील सर्व अधिकारी तीव्र आंदोलनाला उतरतील, असा इशाराही निवेदनात देण्यात आला आहे.

अधिकाऱ्यांच्या सामूहिक रजा आंदोलनामुळे जिल्हा परिषद तसेच पंचायत समित्यांचे नियमित कामकाज आजपासून ठप्प होणार असून, अनेक विभागांचे दैनंदिन व्यवहार प्रभावित होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

निवेदन देताना अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी संदीप कोहिणकर, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेचे प्रकल्प संचालक चंद्रकांत जगताप, उपमुख्य कार्यकारी अधिकारी स्मिता पाटील, गटविकास अधिकारी रघुनाथ पांढरे, विवेक जमदाडे, अमोल जाधव, शंकर कवितके, अमित कदम, उमेश कुलकर्णी, राजाराम भोग, मनोज राऊत, महेश सुळे, जस्मिन शेख आदी उपस्थित होते.

आरोपानुसार, वर्ध्यातील आर्वी पंचायत समितीत मनरेगा योजनेत झालेल्या कथित अपहारप्रकरणी केवळ एका कंत्राटी कर्मचाऱ्यांच्या साक्षीवरून गटविकास अधिकारी सुनीता मरसकोल्हे यांना २ डिसेंबर रोजी रात्री उशिरा अटक करण्यात आली. प्राथमिक किंवा प्रशासकीय चौकशी न करता तसेच महिला अधिकारी असल्याने आवश्यक असलेली कायदेशीर प्रक्रिया न पाळता अटक करण्यात आल्याचा आरोप आंदोलक अधिकाऱ्यांनी केला आहे.

वागदरी येथे महापरिनिर्वाण दिनानिमित्त डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

वागदरी/एस.के.गायकवाड : भारतीय राज्य घटनेचे शिल्पकार महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या ६९ व्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त वागदरी ता.तुळजापूर येथे अभिवादन करण्यात आले.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्सव कमिटी वागदरी च्या वतीने डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या ६९ व्या महापरिनिर्वाण दिनानिमि

येथिल पंचशील बुद्ध विहारात अभिवादनाच्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. प्रारंभी तथागत भगवान गौतम बुद्ध व महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमांचे पूजन माजी सरपंच तथा पंचशील बुद्ध विहार कमिटीचे अध्यक्ष नागनाथ बनसोडे, सेवानिवृत्त पोलीस हवालदार संदिपान वाघमारे, युवा कार्यकर्ते शंकर आप्पा भंडारे, गणेश बिराजदार यांच्या हस्ते पूजन करून डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन करण्यात आले.

या प्रसंगी अभिवादन पर बोलताना रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया(आठवले) चे धाराशिव जिल्हा सचिव तथा पत्रकार एस.के. गायकवाड म्हणाले की महामानव डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांनी जन्मापासून ते महापरिनिर्वाण दिनापर्यंत आपले संपूर्ण आयुष्य समाजसेवेसाठी,देश सेवेसाठी खर्चित केले असून भारतीय संविधानाच्या माध्यमातून देशातील तमाम उपेक्षिताना

मानवी हक्क हिरावून बसलेल्या माणवाला घटनात्मक दृष्ट्या मानवी हक्क मिळवून दिले. देशातील प्रत्येक घटकासाठी डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी काम केले असून त्यांचे कार्य आणि विचार भावी हजारो पिढ्यांना प्रेरणादायी आहेत. याप्रसंगी शालेय विद्यार्थ्यांची ही भाषणे झाली. यावेळी अनिल वाघमारे,हनुमंत वाघमारे,कुंडलिक वाघमारे,बाळू कांबळे,अकाश झेंडारे,मदन चव्हाण,सूर्यकांत वाघमारे,माजी उपसरपंच कविता गायकवाड मुक्ताबाई वाघमारे, ठकुबाई वाघमारे,श्रीदेवी वाघमारे, शकूंतलाबाई वाघमारे, राहीबाई वाघमारे, कोमल झेंडारे,प्रमिला वाघमारे,सविता वाघमारे, शितल झेंडारे, स्वाती गायकवाड, सुष्मा वाघमारे, राधाबाई वाघमारे,सह कार्यकर्ते उपस्थित होते.

कम्युनिटी पोलीसींग अंतर्गत तामलवाडी पोलिसांची येथील सनराईज स्कूलला भेट : विविध विषयावर केले मार्गदर्शन

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

वागदरी/एस. के.गायकवाड : धाराशिव जिल्हा पोलीस अधीक्षक रितू खोखर मॅडम यांच्या मार्गदर्शनाखाली दि.६ डिसेंबर २०२५ रोजी महामानव डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या ६९ व्या महापरिनिर्वाण दिनाचे अवचित साधुन तुळजापूर तालुक्यातील तामलवाडी पोलीस स्टेशनचे पोलीस निरिक्षक गोकुळ ठाकूर व महामार्ग सुरक्षा पथकाचे पोलीस हवालदार पंडित शिंदे, नितीन मुळे,. सायबर पोलीस ठाण्याचे पो.अ. मकसूद काजी,नितीन भोसले, गोपाल सलगर, उमेश माने मपोहेकाँ कोरे सह पोलीस पथकाने कम्युनिटी पोलीसिंग अंतर्गत तामलवाडी येथील सनराईज स्कूलला भेट देऊन विद्यार्थ्यांना विविध विषयाचे कायदेविषयक मार्गदर्शन करून महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांना केले अगळ्या वेगळ्या पद्धतीने अभिवादन.

या याप्रसंगी उपस्थित पोलीस अधिकाऱ्याने शालेय विद्यार्थ्यांना पोलिसा विषयी समाजात असलेले समज गैरसमज,बाल लैंगिक अत्याचार कायदा,वाहतुकीचे नियम,११२ नंबर वर कॉल करून पोलीसांची मदत मागणे, पास्को कायद्यांतर्गत होणारी कारवाई, मुलींच्या बाबतीत बॅड टच गुड टच आदी विषयी सखोल मार्गदर्शन केले. यावेळी शाळेचे मुख्याध्यापक सर्व शिक्षक वृंद, विद्यार्थी उपस्थित होते.

महापरिनिर्वाण दिनी निफाड येथे रक्तदान शिबिर

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

निफाड/प्रतिनिधी : माणसाला माणूस म्हणून जगता यावे यासाठी अखंड आयुष्यभर मानव मुक्तीचा लढा देणारे महामानव विश्वरत्न डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाणदिनी निफाड येथे रक्तदान शिबिर आयोजित करण्यात आले होते.

ब्लड फॉर बाबासाहेब या चळवळीच्या माध्यमातून जगभरात व देशभरातील विविध राज्यांमध्ये एकाच वेळेस हा उपक्रम राबविण्यात आला. निफाड शहरात या उपक्रमाचे दुसरे वर्ष असून या रक्तदान शिबिरात एकूण ५१ रक्तदात्यांनी सहभाग नोंदविला.

निफाड शहर परिसर व तालुक्यातून अनेक रक्तदाते यामध्ये सहभागी झाले निफाड येथील तरुणांच्या माध्यमातून देश सेवेचा व मानव सेवेचा वसा जपत हा सामाजिक उपक्रम राबवून बाबासाहेबांना एक अनोखी श्रद्धांजली रक्तदान शिबिराच्या माध्यमातून वाहण्यात आली. या शिबिराच्या यशस्वीतेसाठी सुहास सुरळीकर, सचिन खडताळे, प्रतीक पगारे, विकास खडताळे राजेश लोखंडे, सागर निकाळे सतीश भालेराव, दादाराव काऊतकर, दुर्योधन गांगुर्डे, लखन खडताळे आदींनी परिश्रम घेतले उपक्रमासाठी नगरपंचायतचे उपनगराध्यक्ष अनिल पाटील कुंदे नगरसेवक देवदत्त कापसे सामाजिक कार्यकर्ते देवा गांगुर्डे यांनी म ोलाचे सहकार्य केले एसएमबीटी येथील रक्तपेढीस रक्त संकलन करण्यात आले यावेळी एसएमबीटी रक्तपेढीचे गणेश टोचे , सचिन आडके व त्यांचे सहकारी उपस्थित होते.

बोदलकसा जलाशयाचे विहंगावलोकन दृष्य

गोंदिया जिल्ह्यातील बोदलकसा हे इंग्रजी मुळाक्षरे वर्णमालेतील ऋ आकाराचे हे जलाशय फारच कमालीच्या रचनेने तयार झाले आहे. भूगोल विषयाचा अभ्यास दौरा कार्यक्रम आयोजित असताना प्रा. प्रशांत मेश्राम गडचिरोली व प्रा. चंद्रप्रकाश बनकर खमारी या दोन्ही अभ्यासकांनी जलाशयाचा आढावा घेतला. हे सुंदर रुप न्याहाळताना जलाशयाचे विहंगावलोकन दृष्य त्यावेळी हे कॅमेरात कैद करण्यात आले.

छायाचित्र मुन्नाभाई नंदागवळी गोंदिया

राष्ट्रीय सेवा योजना विभाग व राज्यशास्त्र अभ्यास मंडळाचा उपक्रम

कल्याणशेट्टी महाविद्यालयात डॉ. आंबेडकर महापरीनिर्वाण दिनानिमित्त अभिवादन कार्यक्रम

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

अक्कलकोट/प्रतिनिधी : डॉ आंबेडकर अमर रहे संविधानाचा विजय असो, हमारा देश हमारा संविधान, अशा घोषणा कल्याणशेट्टी महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी डॉ आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिन आयोजित अभिवादन कार्यक्रमात दिल्या.

महर्षी विवेकानंद समाजकल्याण संस्था संचलित मातोश्री गुरुबसव्वा कल्याणशेट्टी महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना विभाग व राज्यशास्त्र अभ्यास मंडळ यांच्या वतीने डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त अभिवादन कार्यक्रम आयोजित केला होता.

त्यावेळी विद्यार्थ्यांनी डॉ आंबेडकर यांना अभिवादन करून जोरदार घोषणा दिल्या यावेळी प्रा मधुबाला लोणारी, शितल फुटाणे,सोनाली कटकधोंड, ओंकार धीवारे उपस्थित होते.

प्रारंभी प्रा सौरभ भस्मे यांनी डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या कार्याची विद्यार्थ्यांना माहिती सांगितली.

उपक्रमाबद्दल विद्यार्थ्यांचे संस्थेचे अध्यक्ष विद्यमान आमदार सचिनदादा कल्याणशेट्टी, संचालिका शांभवीताई कल्याणशेट्टी, जेष्ठ संचालक मल्लिनाथ कल्याणशेट्टी, सचिव मल्लिकार्जुन मसुती, प्राचार्य डॉ एस आर लोखंडे, जुनिअर विभाग प्रमुख पुनम कोकळगी, सेमी विभाग प्रमुख रूपाली शहा, मुख्याध्यापक मलकप्पा भरमशेट्टी यांनी अभिनंदन केले आहे.

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना विधान भवनात अभिवादन

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

नागपूर : भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार महामानव भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त विधान भवनात त्यांना अभिवादन करण्यात आले. विधान भवनात आयोजित कार्यक्रमात महाराष्ट्र विधान मंडळाचे सचिव जितेंद्र भोळे (सचिव-१) यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. मेघना तळेकर (इटकेलवार) (सचिव-२),डॉ. विलास आठवले (सचिव-३) आणि शिवदर्शन साठ्ये (सचिव-४) यांच्यासह उपस्थित अधिकारी-कर्मचाऱ्यांनी प्रतिमेला पुष्प अर्पण करून अभिवादन केले.

निवडणुकीत दिलेला शब्द पाळण्यासाठी मी कटीबद्ध आहे : आमदार अभिजीत पाटील

आमदार अभिजीत पाटील यांच्या स्थानिक विकास निधीतून कामाचे भूमिपूजन

जाधववाडी ता.माढा मारुती मंदिराच्या सभामंडप कामाचे भूमिपूजन संपन्न

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

पंढरपूर/प्रतिनिधी : माढा विधानसभा मतदारसंघाचे विद्यमान आमदार अभिजीत पाटील यांच्या स्थानिक विकास निधीतून माढा तालुक्यातील जाधववाडी येथे मारुती मंदिराच्या सभामंडपाचे कामाचे भूमिपूजन करण्यात आले. निवडणुकीत प्रचारादरम्यान स्थानिक नागरिकांनी आमदार अभिजीत पाटील यांच्याकडे सभामंडपाची मागणी केली होती, ती पूर्ण केल्यानं नागरिकांमध्ये आनंदाचं वातावरण पाहायला मिळाले.

माढा मतदारसंघातील जनतेने टाकलेला विश्वास आपण नक्कीच सार्थ ठरवू. माढ्याच्या जनतेला दिलेला प्रत्येक शब्द पूर्ण करण्यात आपण यशस्वी होत असून भविष्यातील होणाऱ्या विकासकामांनाही निधी कमी पडू देणार नसल्याचे आमदार अभिजीत पाटील यांनी सांगितले.

विकासकामे करताना राजकारणापलीकडे जाऊन काम करण्याची गरज आहे. विकासकामे करताना कोणताही दुजाभाव आपण केलेला नाही. येणाऱ्या काळात अधिक जोमाने कामे करण्यासाठी आपल्या सर्वांच्या आशीर्वादाची, सहकार्याची गरज आहे. तुम्ही फक्त मला खंबीरपणे साथ द्या, माढा तालुक्याचा सर्वांगीण विकास झाल्याशिवाय राहणार नाही.

यावेळी भारत आबा शिंदे,राजाभाऊ चवरे,आनंद कानडे, दीपक देशमुख, अंगद जाधव, शिवाजी भाकरे, विनंती कुलकर्णी, निलेश पाटील,सरपंच राहुल जाधव, विजय भाकरे, शिवाजी कन्हेरे आदी उपस्थित होते.

ईटकुर येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या ६९ व्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त अभिवादन

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

कळंब: प्रतिनीधी / सुधाकर रणदिवे, कळंब तालुक्यातील ईटकुर येथे भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार, डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या ६९ व्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त महामानवास अभिवादन करण्यात आले.

या वेळी आत्माराम रणदिवे, मिलिंद रणदिवे, राहुल रणदिवे, प्रेमकुमार शिंदे, सुरेश शिंदे, सुधाकर रणदिवे, एल डी शिंदे, प्रविण रणदिवे, वैजिनाथ शिंदे, आदित्य रणदिवे, नाना लगाडे, रोहित रणदिवे, नीलेश शिरसट, बाळराजे सोनवणे, पप्पु गाडे व ईतर सर्व तरूण वर्ग उपस्थित होता.

कला साहित्य संस्कृतीने आपल्या शहराची खरी श्रीमंती समजते : माजी आमदार प्रशांत परिचारक

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

पंढरपूर/प्रतिनिधी : श्री क्षेत्र पंढरपूर येथे अभिजात भारतीय शास्त्रीय संगीताची परंपरा मोठी आहे. आणि त्यामध्ये रसिक मंडळाने सुरुवात केली, त्यांची ही परंपरा पंढरपूर येथील स्वर साधना या संस्थेने अखंड ३५ वर्षे करत अभिजात भारतीय शास्त्रीय संगीताची संस्कार पर्व पंढरपूर कलारसी श्रोत्यांना दिले. याच माध्यमातून स्वर साधनांची सदस्य श्री प्रदीप राव भडगावकर यांनी शास्त्रीय संगीताच्या मैफिलीच्या वेळी आलेल्या सर्व कलाकारांचा आठवणी व आठवणीच्या गंधकोशी या पुस्तकातून शब्द रूपाने लिखित केले आहे. पुस्तकाचे प्रकाशन पंढरपूर तालुक्याची भाग्यविधाते माजी आमदार श्री प्रशांत परिचारक गायक श्री दिलीप टोमके प्रदीप राव भडगावकर बंधू विलास भडगावकर अरुण भडगावकर सीमा भडगावकर यांच्या शुभहस्ते करण्यात आली यावेळी प्रदीप राव भडगावकर आणि सीमा भडगावकर यांचा सत्कार प्रशांत परिचारक यांच्या शुभष्टी करण्यात आला.

प्रास्ताविकामध्ये प्रदीप राव भडगावकर यांनी सांगितले की संगीत सेवा हीच खरी सेवा आणि यामुळे अनेक दिग्गज कलाकारांची सेवा करण्याची भाग्य मला मिळाली आणि त्या आठवणी कायम रचिकांच्या मनात ऊर्जा देत राहाव्या याच भूमिकेतून हे पुस्तक लिहिण्याची प्रेरणा मिळाली. त्यानंतर प्रशांत परिचारक यांनी मनोगत व्यक्त करताना सांगितले की भारतीय अभिजात शासकीय संगीत हा प्रत्येक गाण्याचा मूळ पाया आहे आणि साहित्य कला यावरून शहराची खरी श्रीमंती करते त्यामुळे परंपरागत विठुरायाच्या आशीर्वादाने आणि स्वर साधनेच्या पुढाकार आणि अनेक दिग्गज कलाकारांनी पंढरपूरला येऊन आपली कला सादर केली, आणि तेच संस्कार आपल्या या पंढरी नगरीमध्ये रुजलेली ही खूप मोठी गोष्ट आहे. आणि परंपरा कायम राहावी यासाठी पुढील काळात ही माऊली दूध आणि मनमाडकर परिवार यांनी हे शिव धनुष्य उचललेले आहे. त्यांना माझ्या सदैव पाठिंबा आहे असे त्यांनी परंपरा जपावी असे सांगत पडद्यामागील कलाकाराने अनुभव हे अतिशय प्रेरणादायी असतात आणि ते अनुभव प्रदीप राव यांनी आपल्या लेखनातून पुस्तकांमध्ये प्रसिद्ध केले आहे शुभेच्छा देत अभिनंदन केले.

यावेळी ३५ वर्षाच्या आठवणीचा ठेवा उलगडला याआधी श्री ज्ञानेश्वर दुधाने मिलिंद परिचारक दिलीप राऊत टोमके यांनी आपली मनोगति व्यक्त करीत तो आठवणीचा गंध कोश हा आठवणीच्या ठेवा म्हणून कलारसी श्रोत्यांसाठी एक ऊर्जादायी आणि प्रेरणादायी ठरेल असे सांगत शुभेच्छा दिल्या व कार्यक्रमाचे सुंदर सूत्रसंचालन तुकाराम चिंचणीकर यांनी केले यावेळी भडगावकर परिवार प्रेम करणारी सर्व रसिक श्रुती मंडळी मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी अनेकांनी प्रदीप राव भडगावकर यांचा सत्कार करत त्यांना पुढील आयुष्यासाठी शुभेच्छा दिल्या व कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी प्रवीण ताटे प्रदीप भडगावकर सानिका भडगावकर अजित माने यांनी अधिक परिश्रम घेतले कार्यक्रम यशस्वी केला.

उपविभागीय पोलीस कार्यालय, पंढरपूर यांची कारवाई

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

पंढरपूर : मोहोळ रोड वरील मौजे नारायण चिंचोली येथील हॉटेल राजमुद्रा रिसॉर्ट येथे बेकायदा देह व्यापार सुरू असल्याची माहिती पोलीस प्रशासनास समजली असता त्या ठिकाणी पोलीस प्रशासनाने छापा टाकून कारवाई केली. यामध्ये चार पिडित महिलांची सुटका करण्यात आली आहे. तसेच पाच पुरुष आरोपींना विरुद्ध सद्यस्थितीत कारवाई सुरू आहे.

उपविभागीय पोलीस अधिकारी प्रशांत डगळे यांची माहिती सद्यस्थितीत सदर ठिकाणी कारवाई सुरू आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर हेच खरे राष्ट्रनिर्माते

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

गोंदिया : भारत देशाची घटना लिहून या संपूर्ण भारताला स्वातंत्र्य मिळवून दिले. या देशात सामाजिक, राजकीय, नैतिक, सांस्कृतिक असे सर्वागीण मूलभूत अधिकार देऊन मानवाला स्वातंत्र्य मिळवून दिले. हक्क प्रदान करुन देणारे खरे राष्ट्रनिर्माते डॉ. बाबासाहेब आंबेडकर हेच आहेत. असे प्रतिपादन शाळेचे मुख्याध्यापक रविशंकर इठूले यांनी केले. ते अभिवादन कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानावरुन बोलत होते.

यावेळी मंचावर उपस्थित शाळेतील शिक्षक नीता भलमे, पी. ए. लांजेवार, मुन्नाभाई नंदागवळी, प्रदीप ढवळे, साधना पारधी, आशिष शहारे, कार्तिक शहारे, दीक्षा तुरकर व तुषार महाजन आदी प्रामुख्याने उपस्थित होते.

आर. पी. इठूले यांचे प्रतिपादन : नंगपुरामुर्री निवासी शाळेत अभिवादन कार्यक्रम साजरा

यावेळी अनुसूचित जाती व नवबौद्ध मुलांची शासकीय निवासी शाळा नंगपुरामुर्री येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेला माळ अर्पण करून अभिवादन करण्यात आले. शालेय विद्यार्थ्यांनी डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवनावर आपल्या भाषणातून प्रकाश टाकला. तसेच गीत गायन करुन अभिवादन करण्यात आले.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सुशांत वालदे यांनी केले तर आभार डेवीड जांभूळकर या विद्यार्थ्यांनी मानले.

साईड पट्टी व त्यावरील झाडे झुडपे वाढल्याने अपघाताच्या संख्येत वाढ

गोविंदपुर-खामसवाडी-मोहा मार्गावरील अरुंद रस्त्यामुळे अपघाताच्या प्रमाणात वाढ

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

कळंब प्रतिनीधी/सुधाकर रणदिवे : कळंब तालुक्यातील गोविंदपुर-खामसवाडी-मोहा या मार्गावरील अरुंद रस्त्यामुळे तसेच साईड पट्टी व त्यावरील झाडे झुडपे वाढल्याने अपघाताच्या संख्येत वाढ होत असून बांधकाम विभागाने त्वरित लक्ष देण्याची गरज आहे.

कळंब तालुक्यातील खामसवाडी-मोहा या गावी गुळ पावडर चे कारखाने असल्याने सदरील कारखान्यांना गोविंदपुर -खामसवाडी -मोहा या मार्गावरून ऊस वाहतूक मोठ्या प्रमाणात चालू आहे. खामसवाडी मोहा- या मार्गावरून तेरणा कारखाना ढोकी, नॅचरल कारखाना रांजणी, तडवळा आदी कारखान्यांनाही याच मार्गावरून ऊस वाहतुकीची वाहने जात असल्याने अनेक रस्ते उखडले आहेत. गेल्या वर्षी गोविंदपुर - खामसवाडी या रस्त्याचे डांबरीकरण पूर्ण झालेले आहे. परंतु साईड पट्टी या रस्त्यावर अरूंद असल्याने व काही ठीकाणी झाडे झुडपे वाढल्याने ईतर वाहनांसाठी बाजु देणे अवघड झाले आहे. नागझरवाडी पाटी पासुन मोहा पर्यंतच्या रस्त्याचे काम झालेले नसल्याने हा रस्ता अतिशय खराब झाला असुन जागोजागी गुडघाभर खड्डे पडले आहेत

त्यामुळे उस भरतीचे वहान चालवताना चालकांना तारेवरची कसरत करावी लागत आहे. गोविंदपुर-खामसवाडी रस्त्यावर गेल्या आठवड्यामध्ये ऊस वाहतूक करणाऱ्या ट्रॅक्टरला समोरून येणाऱ्या वाहनाला बाजू देत असताना समोरचे काही न दिसल्याने ट्रॅक्टर ऊस ट्रॉलीसह रस्त्यावर आडवा झाला.

सदरील ट्रॅक्टर चालकाने उडी दुर्दैवी घटना टळली. तर याच अपघाती उसाच्या ट्रॅक्टरला दुचाकी स्वराची धडक बसल्याने दुचाकी स्वार गंभीर जखमी झाल्याचे कळते. तसेच खामसवाडी येथील साठे चौक हे अत्यंत संवेदनशील अपघात प्रवण क्षेत्र बनले आहे.

कारण या चौकात उतार व चढ जागेवरच असल्याने चढावरील वहान वर चढत असताना रिव्हर्स येण्याचे प्रमाण वाढले असुन अशा परिस्थितीत एखादी दुर्दैवी घटना घडण्याची शक्यता नाकारता येत नाही. तर याच चौकात महामंडळाच्या एसटी बसेस ही थांबतात. यामुळे बाहेरगावी जाणारी विद्यार्थी प्रवासी येथे थांबलेले असतात. त्यामुळे या चौकामध्ये असणारा चढ व उतार सार्वजनिक बांधकाम विभागाच्या वतीने तात्काळ भरुन घेऊन त्याची उंची वाढवावी अशी मागणी शेतकरी व ग्रामस्थ व प्रवासी यांच्यातून होत आहे.

गोविदपुर -खामसवाडी-मोहा या रस्त्यावरील सर्व पुलाची उंची वाढवुण घ्यावी कारण सदरील पूल हे गेल्या अनेक वर्षापासून उचलून घेतलेले नाहीत त्यामुळे पावसाळ्यात थोडा जरी पाऊस पडला तरी या पुलाला मोठ्या प्रमाणात पाणी येऊन वाहतूक व्यवस्था बंद होते. तर उसाचा हंगाम चालू झाल्यास ऊस वाहतुकीस मोठी अडचण निर्माण होते. त्यामुळे सदरील सर्वच पुलांची उंची वाढवणे आवश्यक आहे. अन्यथा असेच अपघात दररोज घडत राहतील.

- मा. हनुमंत भाऊ पाटुळे (मानव अधिकार आंदोलन संघटना-संस्थापक अध्यक्ष)

युपीएससी उत्तीर्ण कु. रोहिणी उणदे यांचा रोटरी क्लबतर्फे सत्कार

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

अक्कलकोट/प्रतिनिधी : केंद्रीय लोकसेवा आयोग (UPSC) परीक्षेत यश संपादन करून भारतीय रेल्वे व्यवस्थापन सेवा (IRMS), वर्ग-१ अधिकारी म्हणून निवड झालेल्या कु. रोहिणी इरांणा उणदे यांचा तोरस्कर परिवार आणि रोटरी क्लब अक्कलकोट यांच्या संयुक्त विद्यमाने आज एका भव्य समारंभात सत्कार करण्यात आला.

रोहिणी यांच्या उल्लेखनीय यशामुळे अक्कलकोट शहरात अभिमानाची भावना व्यक्त होत आहे.

कार्यक्रमास रोटेरियन केदार नरोणे, जितेंद्र जाजू, सौ. सोनल जाजू, ॲड. सुनील बोराळकर, सागर हलगोदे, डॉ. विपुल शहा, डॉ. प्रशांत वाली, प्रदीप तोरस्कर, सौ. मिलन तोरस्कर यांसह इतर मान्यवरांची उपस्थिती लाभली.

कार्यक्रमादरम्यान श्री. जितेंद्र जाजू यांनी कु. रोहिणी उणदे यांची विशेष मुलाखत घेऊन त्यांच्या UPSC प्रवासातील अडचणी, अभ्यास पद्धती आणि प्रेरणादायी अनुभवांबद्दल संवाद साधला. उपस्थितांनी मोठ्या उत्सुकतेने त्यांची उत्तरे ऐकली.

सत्कार सोहळ्यात सर्व अक्कलकोट रोटेरियन आणि उपस्थित मान्यवरांनी कु. रोहिणी उणदे यांना भावी सेवाकार्यासाठी मनःपूर्वक शुभेच्छा दिल्या.

या प्रसंगी कु. रोहिणी यांच्या मातोश्री सौ. उणदे तसेच मामाश्री श्री. नरूणे सर हेही उपस्थित होते. त्यांच्या पाठिंबा आणि प्रोत्साहनामुळे रोहिणी यांनी हे यश मिळवल्याचे मत अनेकांनी व्यक्त केले.